# मेट्रो-३च्या कामाची भूगर्भ चाचणी सुरू

## ■ मार्गिकेच्या पाच टप्प्यांमधील विविध ठिकाणी सर्वेक्षण सुरू; माती, खडक तपासणार

**मुंबई : प्रतिनिधी**

बहुचर्चित कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाच्या कामाला पुढील आठवड्यात सुरुवात करण्यात येणार आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे (एमएमआरसी) विविध कामे मार्गी लावण्यात येणार असून याचाच एक भाग म्हणून या मार्गिकेच्या पाच टप्प्यांमधील विविध ठिकाणी जिओ टेक्निकल सर्वेक्षण सुरु झाले आहे.

हे सर्वेक्षण आझाद मैदान, रेसकोर्स, बीकेसी, कफ परेड, विधानभवन अशा ठिकाणी सुरु आहे. एमएमआरसीच्या वतीने पाच कंपन्यांना सात टप्प्यांत काम देण्यात आले आहे. सध्या मेट्रो-३च्या मार्गावर जिओ टेक्निकल सर्वेक्षण सुरु आहे. या सर्वेक्षणामध्ये जमिनीला ड्रील करून जमिनीखालील माती आणि खडक यांची गुणवत्ता तपासण्यात येते. ही गुणवत्ता तपासण्यासाठी येथील माती आणि खडकाचे नमुने लॅबोरेटरीमध्ये पाठवण्यात येतात. यावरून टनेल बोरिंग मशिनची ऑर्डर देण्यात येते. सध्या या मार्गावर सर्वेक्षण आणि विविध चाचण्यांची प्राथमिक कामे कंपन्यांकडून सुरु झाली आहेत. मान्सूनमुळे प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली नव्हती. मात्र, आता येत्या आठवडाभरात मेट्रो ३च्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. मेट्रो-३ च्या मार्गिकेचे बांधकाम पाच कंपन्यांकडून सात टप्प्यांमध्ये करण्यात येणार आहे. या टप्प्यांमध्ये मेट्रोच्या भुयारी बांधकामासाठी अत्याधुनिक ऑस्ट्रेलियन पद्धतीचा वापर होणार आहे. भुयाराचे काम करताना टनेल बोरिंग मशिन आणि एनएटीएम प्रणालीमुळे आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही.



■ काम पूर्ण झाल्यावर वापरण्यात आलेली जमीन पूर्ववत करण्यात येणार असल्याचे एमएमआरसीच्या वतीने सांगण्यात आले. आझाद मैदान येथेही या सर्वेक्षणाचे काम सध्या सुरू झाले आहे. आझाद मैदान हे २० हेक्टर इतक्या जागेवर पसरलेले आहे.

■ त्यापैकी केवळ ३.२ हेक्टर इतकी जागा एमएमआरसीला तात्पुरत्या स्वरूपात लागणार असून ०.१ हेक्टर इतकी जागा कायमस्वरूपी लागणार असल्याचेही एमएमआरसीतर्फे स्पष्ट करण्यात आले.